## थोडक्यात पण महत्वाचे



### जिल्हा परिषद शाळांना बळ देण्याची गरज; समाजानेही पुढाकार घ्यावा

मुखेड (स. गांवकरी) : आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे मोठे काम जिल्हा परिषद शाळा सातत्याने करत आहेत. या शाळांमधील शिक्षकांची मेहनत, विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि पालकांचा विश्वास हीच या शाळांची खरी ताकद आहे. मात्र या शाळांना अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनासोबतच समाजातील जबाबदार व्यक्तींनीही पुढे येण्याची गरज आहे. मुखेड शहरातील जिल्हा परिषद शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करणे, शिक्षकांचे कौतुक करणे आणि शाळेच्या गरजा लक्षात घेऊन मदतीचा हात देणे हा उपक्रम निश्चितच स्वागतार्ह आहे. काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व सामाजिक कार्यकर्ते डॉ. श्रावण रॅपनवाड यांनी नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच जि.प. कन्या शाळेला फॅन भेट देऊन विद्यार्थिनींसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. शाळा म्हणजे केवळ इमारत नसून ती विद्यार्थ्यांच्या भविष्याची पायाभरणी करणारी संस्था आहे. त्यामुळे शाळांचे संरक्षण, विद्यार्थिनींची सुरक्षितता, मूलभूत सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या बाबींना प्राधान्य देणे ही प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि समाजाची संयुक्त जबाबदारी आहे. विशेषतः मुलींच्या शिक्षणासाठी सुरक्षित आणि पोषक वातावरण निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. एखादी घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्यापूर्वीच योग्य नियोजन करून खबरदारी घेणे ही काळाची गरज आहे. सत्ता असो वा नसो, समाजातील प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून सकारात्मक योगदान देणारे प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी ठरतात. जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी अशा सामाजिक सहभागाची गरज आहे. कारण आजच्या शाळांमधूनच उद्याचे जबाबदार नागरिक घडणार आहेत.



### तहसीलदार संजय वारकड यांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तके वाटप


नवीन नांदेड (स. गांवकरी) : शाळेच्या पहिल्या दिवशी नांदेड तालुक्यातील बाभुळगाव येथील नवीन विध्यार्थी स्वागत व विद्यार्थी यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी शाळा परिसरात रांगोळी काढून सुशोभीकरण करण्यात आले होते. 15 जुनं रोजी जिल्हा परिषद शाळा बाभुळगाव येथे शाळेच्या पहिल्या दिवशी नवीन विध्यार्थी स्वागत व मोफत पाठ्यपुस्तके, वाटप नांदेड तहसीलदार संजय वारकड, सरपंच तथा प्रशासक पुंडलिक पाटील मस्के,मंडळ अधिकारी संतोष असकुलकर, तलाठी योगीता अन्नमवार,मुख्याध्यापक सर्जे , शालेय समिती अध्यक्षा चित्रा संभाजी मस्के,पोलीस पाटील संतोष मोरे, पोलीस पाटील आनंदा पवार, गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहिल्या दिवशी पहिल्या वर्गातील विध्यार्थी यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळाल्याने आनंद द्विगुणित झाला होता,शाळा परिसरात किलबिल पहावयास मिळाली.




### अक्कलकोट शहर व तालुका वीज पुरवठा सुरळीत करण्यात यावा

अक्कलकोट (स. गांवकरी) : अक्कलकोट शहर व तालुका मध्ये सर्वत्र वीज पुरवठा सुरळीत करण्यात यावा अन्यथा तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा आरपीआय एकतावादी पक्षाने निवेदनाद्वारे दिला आहे आज वीज मंडळ कार्यालयात आर.पी.आय एकतावादी रोजगार आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विकिबाबा चौधरी यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. सध्या पावसाचे दिवस असल्याने अक्कलकोट तालुका व शहर विजेचा लपंडाव सरासपणे चालू आहे त्यामुळे महिला बालके वृद्ध व्यक्तींना वीज अभावी उकडण्याचा भरपूर त्रास होत आहे त्यामुळे विजेचा प्रवाह सुरळीत करण्यासाठी जे काही अडीअडचणी येत असतील त्या अडीअडचणी म्हणजे विजेचा प्रवाह अखंड पणे चालू ठेवण्यासाठी काही ठिकाणी जाण्याचा अथवा तारांचा किंवा खांब्याचा अडथळे येत असतील त्या अडचणीवर मात करून विजेचा प्रवास खंडित व सुरळीतपणे चालू ठेवावा जेणेकरून वीज अभावी कुणाची कामे किंवा कोणालाही त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन ताबडतोब विजेचा प्रवाहामध्ये येणारे अडथळे दूर करून सर्व अक्कलकोट शहर तालुके गावांना दिलासा द्यावा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी व जनता सामाजिक बहुउद्देश संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे.

### चोरी गेलेले सोन्याचे दागिने मूळ मालकास परत; ओतूर पोलिसांना यश




ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नेतवड येथे बजाबा महादू कुटे (वय ८५) यांनी त्यांच्या पत्नीचे जपून ठेवलेले दागिने दि. १ ते ७ मे २०२६ रोजी अज्ञात व्यक्तींने चोरी केल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुसार ओतूर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर गुन्ह्याचा सखोल तपास केल्यानंतर तो गुन्हा फिर्यादी यांच्या घराच्या बाजूलाच राहणाऱ्या अभिषेक खंडू कुटे (वय ३२) याने केला असल्याचे उघड झाले. सदर आरोपीस १३ मे २०२६ रोजी अटक करण्यात आली होती. त्यावेळी सदर आरोपीकडून सदरचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता.

# पारनेर तालुक्यात पाणी-चाऱ्याचा गंभीर प्रश्न

**सुनिताताई सोबले यांचे प्रशासनाला निवेदन : पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांनाही दिल्या निवेदन : निवेदनातून वेधले पारनेर शहर व परिसरातील भीषण परिस्थितीकडे लक्ष.**

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर शहर व तालुक्यात सध्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, सर्वसामान्य नागरिक व पशुधन पाण्यासाठी आणि चाऱ्यासाठी होरपळून निघत आहे. या पार्श्वभूमीवर, तालुक्यात तात्काळ शासकीय टँकर सुरू करावेत, अवैध पाणी उपसा थांबवावा आणि पठार भागावर जनावरांसाठी चारा छावण्या उभारण्यात याव्यात, अशी आग्रही मागणी सामाजिक कार्यकर्त्या सुनिताताई सोबले यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी पारनेरचे आमदार काशिनाथ दाते आणि तहसीलदार गायत्री सौंदणे यांना सविस्तर मागण्यांचे निवेदन सादर केले. तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात सुनिताताई सोबले



यांनी तालुक्यातील सोबलेवाडी, कुंभारवाडी, विरोली, करंडी या गावांसह पारनेर शहर व परिसरातील भीषण सद्यस्थितीकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. चालू उन्हाळ्यात या संपूर्ण भागात पाण्याचे स्रोत पूर्णपणे आटले असून, पाण्यासाठी नागरिकांना मोठी भटकंती करावी लागत आहे. ज्या गावांमध्ये आणि वाड्या-वस्त्यांवर पाण्याचे सर्व स्रोत आटले आहेत, तिथे कोणतीही दिरंगाई न करता तातडीने शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच, तालुक्यातील ज्या तलावांमध्ये सध्या थोडेफार पाणी शिल्लक आहे, त्याचे योग्य नियोजन करून ते पाणी केवळ पिण्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावे, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

याशिवाय, तालुक्यातील मुख्य पाण्याच्या स्रोतांच्या परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर अवैध पाणी उपसा सुरू असून, यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई अधिकच तीव्र होत आहे. प्रशासनाने हा अवैध उपसा तात्काळ रोखून ते पाणी पिण्यासाठी सुरक्षित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. पाण्यासोबतच तालुक्यात चाऱ्याचा प्रश्नही अत्यंत उग्र बनला असून जनावरांना जगवणे शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. त्यामुळे गरज असलेल्या गावांमध्ये तातडीने चारा उपलब्ध करून द्यावा आणि पारनेर तालुक्याच्या पठार भागावर शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी तात्काळ 'चारा छावण्या' सुरू कराव्यात, या प्रमुख मागण्या सोबले यांनी लावून धरल्या आहेत.

पारनेर तालुक्यातील जनतेला आणि पशुधनाला या भीषण टंचाईतून दिलासा देण्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर योग्य नियोजन करावे, हीच आमची मुख्य मागणी आहे, असे सांगत सुनिताताई सोबले यांनी इशारा दिला की, जर यावर तात्काळ ठोस उपाययोजना झाल्या नाहीत, तर नागरिकांच्या हक्कासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडावे लागेल. आता यावर स्थानिक लोकप्रतिनिधी आणि महसूल प्रशासन किती वेगाने पावले उचलते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

> पारनेर तालुक्यात पाणी आणि चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. सर्वसामान्य नागरिक आणि पशुधन या भीषण टंचाईत होरपळून निघत असताना प्रशासन मूग गिळून गप्प बसू शकत नाही. जर तात्काळ शासकीय टँकर आणि चारा छावण्या सुरू करून जनतेला दिलासा दिला नाही, तर नागरिकांच्या हक्कासाठी आम्हाला लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडावे लागेल.
>
> — **सुनिताताई सोबले (सामाजिक कार्यकर्त्या, पारनेर)**

## नव्या शैक्षणिक वर्षाची आगळीवेगळी सुरुवात

कळवण : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील भेंडी, कुंडाणे, ओतूर, सिरसमणी, नरुळ, मेहदर, वडाळे, येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे आगळ्यावेगळ्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेने विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय आणि प्रेरणादायी शालेय प्रवेशाचा अनुभव देत शिक्षणाबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण केले.यावेळी नवागत विद्यार्थ्यांची बगीमधून भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातून मिरवणूक निघाल्यानंतर विद्यार्थ्यांवर फुलांचा वर्षाव करत त्यांचे आनंददायी स्वागत करण्यात आले. गावातील नागरिक, पालक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांचा उत्साह वाढविला.प्रभात फेरीदरम्यान विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगणारे विविध घोषवाक्य देत गावकऱ्यांमध्ये शिक्षणाबाबत जनजागृती केली.



त्यामुळे संपूर्ण गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांसाठी पुरणपोळीच्या स्वादिष्ट जेवणाचीही व्यवस्था करण्यात आली. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना आनंददायी अनुभव मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह आणि आनंद स्पष्टपणे दिसून येत होता.

## रस्त्याच्या कडेला असलेल्या धोकादायक विहिरींची पाहणी

सोलापूर : (स. गांवकरी)

पंढरपूर सातारा महामार्गावरील वाढत्या अपघातांना रोखण्यासाठी तसेच महामार्गावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने महामार्ग संलग्न अपघात प्रवण क्षेत्राच्या ठिकाणी तात्काळ उपाययोजना कराव्यात अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तीकेयन एस. यांनी दिल्या.

रविवार दि. 14 जून रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास पंढरपूर - सातारा महामार्गावरील तांदूळवाडी जवळ टेम्पो चालकाचा वाहनावरील ताबा सुटून रस्त्यालगत असलेल्या विहिरीत वाहन कोसळले या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्तीकेयन एस. यांनी तांदुळवाडी (ता.माळशिरस) हद्दीतील महामार्ग संलग्न अपघात प्रवण क्षेत्राची पाहणी केली यावेळी त्यांच्या समवेत प्रांताधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ, महाराष्ट्र



राज्य रस्ते विकास महामंडळाचे उप अभियंता पी. एस.राऊत तसेच संबंधित अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले , सातारा- पंढरपूर महामार्गावरील तांदुळवाडी हद्दीत रस्त्यालगत धोकादायक तीन विहिरी असून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने तात्काळ रस्त्यालगत असणाऱ्या विहिरींच्या संरक्षक भिंतीचे काम सुरू करावे. तसेच अपघात प्रवण क्षेत्रावर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अशा सूचना करून रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे का, भूसंपादन प्रमाणे रस्ता झाला आहे का, मार्गावरील पुल व रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसार झाले आहे का, रस्त्याची रुंदी, रस्त्यावर गतिरोधक, लोखंडी बॅरिकेट, रिफ्लेक्टर संरक्षण कठडे, प्रकाश व्यवस्था, यासारख्या उपाययोजना आहेत का याची चौकशी करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे. या चौकशीमध्ये दोषी असणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी येथील ग्रामस्थांनी तांदुळवाडी हद्दीत वारंवार अपघात घडत असून रस्त्याची काम भूसंपादनाप्रमाणे झाले नाही. रस्त्याचे काम पूर्णपणे निकृष्ट दर्जाचे झाले आहे. तसेच तांदुळवाडी हद्दीतील उघडे पुलावर सतत खड्डे पडत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. संबंधित ठेकेदाराकडून तात्पुरती डागडुजी करण्यात येते. सदर पुलाचे स्ट्रक्चर ऑडिट करावे अशी मागणी केली. जिल्हाधिकारी यांनी तांदुळवाडी हद्दीतील महामार्गालगत असणाऱ्या तीन विहिरींची तसेच उघडे पूल येथील पाऊणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

## फेटे बांधून, लेझीम-झांज ढोल ताशाच्या गजरात विद्यार्थ्यांची मिरवणूक; श्री नागेश विद्यालयाचा प्रवेशोत्सव उत्साहात

जामखेड : (स. गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ सोमवारी (दि. १५ जून) उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. विद्यालयाचा प्रवेशोत्सव विविध उपक्रमांनी रंगला. पाचवीच्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक फेटे बांधून भव्य मिरवणूक काढण्यात आली. एनसीसी पथक व मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.




कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यावेळी नवीन विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला तसेच शैक्षणिक पुस्तकांचे वितरण करण्यात आले.

या प्रसंगी अध्यक्ष स्कूल कमिटीचे श्रेष्ठ सदस्य हरिभाऊ बेलेकर, उत्तर विभाग सल्लागार समिती सदस्य राजेंद्र कोठारी, विनायक राऊत, नगरसेवक राजेंद्र गोरे, प्राचार्य मडके बि के,पर्यवेक्षक जाधवर एस व्ही,अमोल बहिर, अशोक यादव, मुक्तार सय्यद, जितेंद्र बोरा, विद्यार्थ्यांचे पालक, ग्रामस्थ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात प्राचार्य बी. के. मडके यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करताना विद्यालय स्पर्धा परीक्षा, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये अग्रस्थानी राहील, असा विश्वास व्यक्त केला. स्कूल कमिटी सदस्य विनायक राऊत यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयाच्या पाठीशी कायम उभे राहण्याची ग्वाही दिली.

अध्यक्षीय समारोपात हरिभाऊ बेलेकर यांनी विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता, विविध उपक्रमांतील यश आणि शिक्षकांची तळमळ यांचे कौतुक करत नवीन विद्यार्थ्यांचे सहर्ष स्वागत केले. प्रवेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालकांनी विशेष कौतुक करून विद्यालयाचे अभिनंदन केले. विद्यार्थी मिरवणूक, लेझीम-झांज पथक तसेच एनसीसी पथकाचे नियोजन एनसीसी ऑफिसर मयूर भोसले यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष ससाणे यांनी मानले.

## सक्षम गटविकास अधिकारी मिळेल का?

- हदगाव तालुक्यातील ग्रामपंचायती वाऱ्यावर
- तामसा येथील शाळेत मूलभूत सुविधांचा प्रश्न ऐरणीवर

तामसा : (स. गांवकरी)

हदगाव तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नेमण्यात आले असतानाही विकासकामे आणि मूलभूत सुविधांचे प्रश्न कायम असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही ग्रामपंचायतींमध्ये सरपंचांनी मागील चार महिन्यांपासून पदभार स्वीकारलेला नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परिणामी भीषण पाणीटंचाई, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि इतर नागरी सुविधांबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, तामसा येथील पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी प्रवेश उत्सव कार्यक्रम सुरू असताना पालकांनी शाळेतील विविध समस्यांचा पाढा अधिकाऱ्यांसमोर वाचला. यावेळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तसेच शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पालकांनी शाळेतील विद्यार्थी संख्येच्या तुलनेत स्वच्छतागृहे, मुताऱ्या व शौचालयांची संख्या अत्यंत अपुरी असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. विशेषतः मुली आणि महिला शिक्षकांना शौचालयांच्या अभावामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे सांगितले. काही वेळा शाळेच्या परिसराच्या बाहेर जावे लागत असल्याने ही परिस्थिती चिंताजनक असल्याचे पालकांनी नमूद केले. याशिवाय शाळेत पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांना बाहेर जाऊन पाणी आणावे लागत असल्याचा मुद्दाही पालकांनी उपस्थित केला.

# डॉ. सी व्ही रमण स्पर्धा परीक्षेत ढवळपुरी आश्रमशाळेचे यश

**दोन विद्यार्थ्यांची इस्त्रो सहलीसाठी निवड**

पारनेर : (स. गांवकरी)

डॉ. सी व्ही रमण परीक्षा ही विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणारी एक लोकप्रिय विज्ञान स्पर्धा परीक्षा आहे. याचा मुख्य उद्देश म्हणजे मुलांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा, तर्कशुद्ध विचार आणि संशोधक वृत्ती वाढवणे हा आहे. या स्पर्धा परीक्षेत पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील प्राथमिक आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे.

प्राथमिक आश्रमशाळेतील इयत्ता सहावीतील १८ विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रवेशित झाले होते. पैकी अश्विन संजय गिरवाल हा पारनेर तालुक्यात पहिला आला तर मनस्वी सचिन चौधरी हिचा चौथा क्रमांक आला आहे. तर आराध्या अनिल कपाटे, कृष्णा अनिल बिडे, गौरी राजेंद्र बुचुडे, स्वरांजली स्वप्नील बुळे, आर्यन अंकुश चितळकर, कुणाल मच्छिंद्र चितळकर, स्नेहा शरद चितळकर, श्रेया पंकज डोळझाके, सुयश लक्ष्मण पाचारणे, माही खलील शेख, कार्तिक राजू थोरात, सत्यजित कैलास थोरात, साई आप्पासाहेब वाबळे, अन्वीता राजाराम वाघ, आरव विजय वाघ, गायत्री किसन वाघ

हे विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार



संघातर्फे डिजिटल मिडीयाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड व प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना विनोद गायकवाड म्हणाले की, आश्रमशाळा ढवळपुरी येथे विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापुर्ण शिक्षण दिले जाते. म्हणूनच येथील विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षेत अलौकीक असे यश मिळवित आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक राजाराम वाघ, विषय शिक्षक संतोष पट्टेकर, लतिफ राजे, प्रशांत पादीर, समाधान भुसारे, भावना बेरड यांचे मार्गदर्शन लाभले. यासर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाचे सहायक संचालक विनोद लोंढे, संस्थेचे अध्यक्ष शाहिद काझी, सचिव रेहान काझी, विश्वस्त आस्मा काझी, सहायक लेखाधिकारी संजय शेलार, निरीक्षक तुकाराम कातकडे, निरीक्षक विनोदकुमार लाड, सरपंच सौ. नंदाताई गावडे, उपसरपंच बबन पवार सर, सेवा सोसायटीचे चेअरमन भागाजी गावडे, माजी सरपंच डॉ. राजेश भनगडे, दुर्गेश्वरी दूध संस्थेचे चेअरमन सुखदेव चितळकर, माध्य. व उच्च माध्यमिक आश्रमशाळेचे प्राचार्य बापूसाहेब रुपनर, प्राथमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक संदिप महांडुळे, सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, समस्त ग्रामस्थ ढवळपुरी यांनी अभिनंदन केले आहे.

डॉ . सी व्ही रमण स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेले अश्विन संजय गिरवाल व मनस्वी सचिन चौधरी या दोन विद्यार्थ्यांची इस्त्रो (श्रीहरिकोटा) येथील अवकाश संशोधन केंद्रात सहली करीता निवड झालेली आहे. इस्त्रोची प्रदर्शन सहल आणि भेट विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढविण्यासाठी खूप उपयोगी पडते. तसेच या विद्यार्थ्यांना विज्ञान साहित्य बक्षीस म्हणून भेट मिळणार आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## शिवांजली विद्यानिकेतनमध्ये विद्यार्थ्यांचे गुलाब-पुष्प देऊन स्वागत

पिंपळवंडी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील चाळकवाडी येथील शिवांजली विद्यानिकेतन मध्ये शैक्षणिक वर्ष २०२६ -२०२७ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते नवप्रवेशित विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प, शालेय दप्तर, पाठ्यपुस्तके व केळी देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांना मिळालेल्या या प्रेमळ स्वागतामुळे लहानग्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व प्रसिद्ध कवी श्री. शिवाजीराव चाळक हे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चाळकवाडीचे शाळा समिती अध्यक्ष सन्मा. प्रदीप वायकर तसेच सर्पमित्र आकाश माळी उपस्थित होते. शिक्षिका श्रीमती कमल शिरोळे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "शाळेची खरी संपत्ती विद्यार्थी हेच आहेत. विद्यार्थ्यांनी शाळेला आपले दुसरे घर समजून शाळेचा लौकिक वाढवावा." विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.भानुदास चासकर यांनी आपल्या भाषणात शालेय व्यवस्था व शिस्तीचे पालन करून विद्यार्थ्यांनी यशाची प्राप्ती करावी, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात कवी शिवाजीराव चाळक यांनी विद्यार्थ्यांना उच्च ध्येय ठेवून नियमित उपस्थिती, शिकवलेल्या पाठ्यक्रमाचा सराव, शालेय शिस्त, गुरुजनांचा वडीलधाऱ्यांचा आदर करण्याचा अंगीकार करणे आवश्यक आहे, असे सांगितले. याप्रसंगी बालभारतीच्या इयत्ता दुसरीच्या पाठ्यपुस्तकात कवी शिवाजीराव चाळक यांची "मासा" नावाची कविता समाविष्ट झाली आहे. या अभिमानास्पद बाबीबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अशोक कुऱ्हाडे यांनी केले, तर गणित शिक्षक श्री. प्रशांत शेटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## अपघाताचे प्रमाण कमी करण्याचे दृष्टीने विशेष उपाययोजना

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलिस ठाणे हद्दीत अपघाताच्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. हे अपघातांचे प्रमाण करण्यासाठी आवश्यक त्या सुरक्षिततेच्या उपाययोजना राबविण्यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली. यावेळी सेव्ह लाईफ फाउंडेशनचे श्रेयश एरंडे, चेतन दोडामणी, महामार्ग प्रकल्पाचे मार्गदर्शक शिवशंकर टेलामनी, मयुर औटी यांच्यासह अनेक अपघाताच्या ठिकाणांवर भेट देण्यात आली. त्याठिकाणी सुरक्षिततेबाबत आवश्यक त्या उपाययोजना बाबत चर्चा करण्यात आली. योग्य त्या सूचनांसह लवकरच काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन यावेळी महामार्ग प्रकल्प मार्गदर्शकाकडून देण्यात आले. सदर ठिकाणी रम्बलर बसविणे, दिशा दर्शक फलक लावणे, ब्लिन्कर्स लावणे तसेच इतर उपाययोजना तात्काळ करण्यास येत असल्याचे ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी सांगितले.

## ठाणे मनपाची सर्वसाधारण सभा सभाशास्त्रानुसार सुरळीत चालणार



ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिकेची मा. सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक 18/06/2026 रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात होणार आहे. या सभेच्या पार्श्वभूमीवर आज सर्वपक्षीय गटनेत्यांची बैठक स्थायी समिती सभागृहात सकारात्मक वातावरणात पार पडली. आगामी महासभेचे कामकाज सुरळीत, शिस्तबद्ध आणि सभाशास्त्राच्या नियमांनुसार पार पडेल असा विश्वास महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्यासह सर्वपक्षीय गटनेत्यांनी व्यक्त केला. या बैठकीस महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते शानू पठाण, शिवसेना गटनेते पवन कदम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट)चे गटनेते नजीब मुल्ला, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) चे गटनेते अभिजीत पवार तसेच भाजपाचे ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले उपस्थित होते. बैठकीत महासभेच्या कामकाजाचा क्रम निश्चित करण्यात आला. सभेच्या सुरूवातीला प्रश्नोत्तरे घेण्यात येणार आहेत. तसेच सचिव विभागाकडे 7 लक्षवेधी प्राप्त झाल्या असून पाच लक्षवेधी या आगीसंदर्भात आहेत तर दोन लक्षवेधी या टीडीआर संदर्भात आहे. आगीसंदर्भात व टीडीआर अशा दोन लक्षवेधीसाठी प्रत्येकी एक तास असा दोन तासांचा स्वतंत्र वेळ राखून ठेवण्यात आला आहे. लक्षवेधीनंतर विषयपत्रिकेला सुरूवात केली जाणार आहे. महासभेतील चर्चा नियोजनबद्ध पद्धतीने व्हावी, सर्व सदस्यांना आपली भूमिका मांडण्याची संधी मिळावी आणि लोकहिताचे विषय प्रभावीपणे सभागृहात मांडले जावेत, यावर गटनेत्यांच्या बैठकीत एकमत झाले. बैठकीनंतर सर्वपक्षीय गटनेत्यांनी आगामी महासभा सभाशास्त्राच्या नियमांचे पालन करून शांततापूर्ण व सकारात्मक वातावरणात पार पडेल, असा विश्वास व्यक्त केला.

## श्री रामकृष्ण महाराज काळे गुरुजींच्या पुण्यतिथी सोहळ्याला मांदियाळी

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील श्री विठ्ठल रुख्मिणी अध्यात्मिक केंद्राचे संस्थापक व वारकरी संप्रदायातील विभूती वैकुंठवाशी गुरुवर्य रामकृष्णजी महाराज काळे यांच्या २६ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आळंदी येथील भगवान महाराज कराड यांचे किर्तन झाले.झालेल्या किर्तन सोहळयाला संत महंतांसह भाविकांची मोठी मांदियाळी जमली होती. यावेळी झालेल्या पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने देवगड संस्थानचे प्रमुख गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख वेदांतचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी रामकृष्ण आश्रमाला भेट दिली.

# आदिवासींचे जिल्हाधिकारी कार्यालयवर धरणे आंदोलन

## कोळी महासंघाचे धरणे आंदोलन

रावेर: (स. गांवकरी)

कोळी महासंघ राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार श्री रमेश दादा पाटील यांच्या नेतृत्वात व युवा प्रदेश अध्यक्ष अँड चेतन दादा पाटील यांच्या मार्गदर्शनात जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय येथे राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात आले .

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले आंदोलन टोकरे कोळी जमातीच्या प्रश्नांसंदर्भात

तात्कालीन मुख्यमंत्री श्री एकनाथराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दि २०/१०/२०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने अंमलबजावणी होणे अपेक्षित होती . परंतु महाराष्ट्र राज्यातील विधानसभा, नगरपरिषद महानगरपालिका जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे महाराष्ट्र शासनाकडून आदिवासी टोकरे कोळी समाजाचे परिपत्रक काढण्यास दिरंगाई झाल्याने , समाजामध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे . समाजाची भावना व कोळी महासंघाने केलेल्या पाठपुरावाच्या अनुषंगाने आपणास या स्मरण पत्राद्वारे पुन्हा एकदा विनंती करण्यात येत आहे की ,

माननिय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीतील बांधवांचे जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभ रित्या मिळणे व रक्त नात्यातील समाज बांधवांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत आपण दि २०/१०/२०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व इतिवृत्त प्रमाणे आपण त्वरित परिपत्रक काढण्याकरिता माननिय मुख्यमंत्री महोदयांना पत्र पाठवावे तसेच जळगाव जिल्ह्यात अनुसूचित जमाती (एस टी) प्रमाणपत्र तपासणी समितीचे कार्यरत कार्यालय पुर्ण क्षमतेने तात्काळ पूर्ण वेळ सुरू करण्यात यावे . तसेच ग्रामपंचायत सरपंच सदस्य यांना जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी एक वर्ष मुदत वाढ मिळावी असे लेखी निवेदन

आज जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय येथे राज्यव्यापी एकदिवसीय धरणे आंदोलन करून जळगाव जिल्हाधिकारी साहेब यांना देण्यात आले .

यावेळी आदिवासी टोकरे कोळी समन्वय समिती जळगाव जिल्हा अध्यक्ष जितेंद्र सोनवणे कोळी महासंघ जेष्ठ नेते बाळासाहेब सैंदाणे कायदेशीर सल्लागार अँड अमित सोनवणे जिल्हाध्यक्ष हरिलाल कोळी मुकेश सोनवणे संपर्क प्रमुख सुभाष सोनवणे टोकरे कोळी आंदोलनकर्ते प्रल्हाद सोनवणे युवा अध्यक्ष संदीप कोळी नितीन कांडेलकर नगरसेवक किशोर बाविस्कर दिपक तायडे नारायण कोळी व्हि टी सोनवणे संतोष कोळी रामचंद्र कोळी मंगलाताई सोनवणे मंदाताई सोनवणे रत्नाताई बागुल सुमनताई मराठे योगेश बाविस्कर गुलाब बाविस्कर गजानन सोनवणे आकाश कोळी रघुनाथ कोळी देविदास कोळी विजय बाविस्कर खेमचंद कोळी विशाल सपकाळे भाईदास कोळी पितांबर कोळी महेश कोळी रोहन सोनवणे किरण तायडे पांडुरंग सोनवणे यांच्या सह कोळी महासंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## राहुल शेवंतेचा MHT-CET मध्ये ९४.१९% चा गौरवशाली यश

पारनेर : (स. गांवकरी)



पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय (आश्रमशाळा) येथील विद्यार्थी राहुल राजेंद्र शेवंते याने MHT-CET (PCM) परीक्षेत ९४.१९ टक्के गुण मिळवून उत्कृष्ट यश संपादन केले आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल शाळेने राहुलचा सत्कार करून त्याचा गौरव केला. यावेळी प्राचार्य श्री. बापूसाहेब रुपनर सर, मुख्याध्यापक श्री. संदीप महांडुळे सर, शिक्षक श्री. फंड सर, श्री. मिसाळ सर, श्री. देवकाते सर, श्री. महांडुळे सर, श्री. वाघमारे सर, श्री. दातीर सर, श्री. सय्यद अमीन सर, श्री. शेंडगे सर यांच्यासह सर्व शिक्षकांनी राहुलच्या यशाचे श्रेय त्याच्या मेहनतीला व मार्गदर्शनाला दिले. विशेष सत्कार इतर मागास बहुजन कल्याण विभाग अहमदनगर यांच्या वतीने सहा. संचालक मा. श्री. विनोद लोंढे साहेब, लेखाधिकारी मा. श्री. संजय शेलार साहेब, निरीक्षक मा. श्री. कातकडे साहेब, मा. श्री. लाड साहेब यांच्या हस्ते करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. शाहिद काझी सर, सचिव मा. श्री. रेहान काझी सर, ढवळपुरीचे सरपंच सौ. नंदाताई भागाजी गावडे, उपसरपंच श्री. बबनराव पवार, सेवा संस्थेचे चेअरमन श्री. भागाजी गावडे, माजी सरपंच डॉ. राजेश भनगडे, चेअरमन श्री. सुखदेवजी चितळकर यांसह ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी संचालक, ग्रामस्थ, पालक आणि शाळा व्यवस्थापन समितीने राहुल व त्यांचे पालक श्री. राजेंद्र शेवंते यांचे अभिनंदन केले. राहुलच्या यशाने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, इतर विद्यार्थ्यांसाठी त्याने प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे.

## पुणे-शिर्डी थेट रेल्वे सेवेला हिरवा कंदील

- खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला अखेर यश
- लाखो प्रवाशांची दीर्घकालीन मागणी पूर्ण
- शिक्षण, आरोग्य, व्यापार आणि धार्मिक पर्यटनाला मिळणार नवी गती

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



पुणे-शिर्डी थेट रेल्वे सेवेचा आज शुभारंभ होताच पुणे, अहिल्यानगर, कोपरगाव आणि शिर्डी परिसरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला पूर्णविराम मिळाला आहे. राज्यातील दोन महत्त्वाच्या केंद्रांना जोडणारी ही रेल्वे सेवा सुरू झाल्याने प्रवाशांच्या प्रवासाचा वेळ, खर्च आणि गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार असून या सेवेमुळे धार्मिक पर्यटनासह शिक्षण, आरोग्य आणि व्यापार क्षेत्रालाही मोठी चालना मिळणार आहे. अहिल्यानगर स्थानकावर खा. लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून गाडीचे प्रस्थान करण्यात आले.

या रेल्वे सेवेच्या मंजुरीसाठी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी खासदार नीलेश लंके यांनी रेल्वे मंत्रालय, वरिष्ठ रेल्वे अधिकारी तसेच लोकसभेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला होता. विविध स्तरांवर केलेल्या प्रयत्नांमुळे अखेर ही सेवा प्रत्यक्षात सुरू झाल्याने नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पुणे हे राज्यातील प्रमुख शैक्षणिक, औद्योगिक आणि आरोग्य केंद्र मानले जाते. दुसरीकडे शिर्डी हे देश-विदेशातील लाखो साईभक्तांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, शेतकरी आणि भाविक प्रवास करतात. थेट रेल्वे सेवा उपलब्ध झाल्याने या सर्व घटकांना अधिक सुरक्षित, जलद आणि किफायतशीर प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

या रेल्वे सेवेचा लाभ केवळ प्रवासी वाहतुकीपुरता मर्यादित राहणार नसून कृषी व व्यापारी क्षेत्रालाही त्याचा मोठा फायदा होणार आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांच्या बाजारपेठांशी अधिक प्रभावी संपर्क साधता येणार असून व्यापारवृद्धीलाही चालना मिळेल. तसेच उपचारासाठी पुण्यात जाणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना या सेवेचा विशेष लाभ होणार आहे. खासदार नीलेश लंके यांनी लोकसभेत अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वेसंदर्भातील विविध प्रश्न सातत्याने मांडले आहेत. पुणे-शिर्डी थेट रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी त्यांनी रेल्वेमंत्र्यांची भेट घेऊन अनेकदा पाठपुरावा केला होता. आज त्या प्रयत्नांना यश मिळाल्याने जिल्ह्यातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## दिवा स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडणाऱ्या प्रवाशांसाठी जनजागृती

ठाणे : (स. गांवकरी)




### ठाणे रेल्वे पोलिसांची विशेष मोहीम

वाढत्या रेल्वे अपघातांना आळा घालण्यासाठी आणि रेल्वे रुळ ओलांडण्याच्या धोकादायक सवयीबाबत प्रवाशांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी ठाणे रेल्वे पोलिसांनी दिवा रेल्वे स्थानकात विशेष जनजागृती मोहीम राबविली. मा. पोलीस आयुक्त (लोहमार्ग) मुंबई राकेश कलासागर, मा. पोलीस उपआयुक्त (मध्य परिमंडळ) प्रज्ञा जेडगे-मंडम तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त नंदराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम आयोजित करण्यात आली. दिवा रेल्वे स्थानकात सकाळच्या गर्दीच्या वेळेत सकाळी 9 ते 11 या कालावधीत रेल्वे रुळ ओलांडणाऱ्या प्रवाशांना सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देण्यात आले. या मोहिमेत ठाणे रेल्वे पोलीस ठाण्याचे 4 अधिकारी, 45 पोलीस अंमलदार, 1 रेल्वे सुरक्षा बल (RPF) अधिकारी, 5 RPF कर्मचारी आणि एमएसएफचे कर्मचारी सहभागी झाले होते. मोहीमेदरम्यान विशेष आकर्षण म्हणून 'यमदूत'चा वेश परिधान केलेल्या व्यक्तीद्वारे रेल्वे रुळ ओलांडणाऱ्या प्रवाशांना थांबवून त्यांना गुलाबाचे फूल देण्यात आले आणि जीव धोक्यात घालून रुळ ओलांडू नये, असा संदेश देण्यात आला. तसेच मेगाफोनद्वारे विविध घोषणांमधून सुरक्षित प्रवासाचे महत्त्व पटवून देण्यात आले. प्रवाशांना रेल्वे ब्रिजचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. "एक गाडी गेली म्हणून रुळ ओलांडू नका, दुसरी गाडी मागून येऊ शकते", "घरी आपली कोणी तरी वाट पाहत आहे" अशा संदेशांद्वारे जनजागृती करण्यात आली.

दिवा रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक 3 आणि 4 वर मानवी साखळी तयार करून रुळ ओलांडणाऱ्या प्रवाशांना मज्जाव करण्यात आला. सदर मोहिमेत अर्चना दुसाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक ठाणे, ठाणे पोलीस निरीक्षक केंद्रे, सपोनि प्रमोद देशमुख, पोउनि संजय भांगरे, मपोउनि अनिता कदम यांच्यासह रेल्वे पोलिसांचा सक्रिय सहभाग होता.

या उपक्रमाला रेल्वे प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ही जनजागृती मोहीम पुढेही सातत्याने सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती ठाणे रेल्वे पोलिसांनी दिली.

## नवागतांचे पुस्तके गणवेश देऊन स्वागत

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा खुर्द जिल्हा परिषदेच्या सेमी इंग्लिश मराठी मुलांच्या शाळेत इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या नवागतांचे झांज व ढोल पथकाद्वारे मिरवणूक काढून वाजतगाजत स्वागत करण्यात आले.

शासनाच्या धोरणानुसार पाठयपुस्तकांसह बूट व गणवेशाचे वाटप करून प्रवेशोत्सव साजरा करण्यात आले. यावेळी झालेल्या स्वागत कार्यक्रम प्रसंगी प्रशिक्षणार्थी शिक्षणाधिकारी क्रांती आरसुड,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ.प्राजक्ता कडू पाटील हया होत्या तर माजी जिल्हा परिषद सदस्य महंमदभाई आतार,केंद्र प्रमुख बाळासाहेब काशीद,शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य पत्रकार सुधीर चव्हाण,स्वप्नील मगर, अँड.अनिल लोखंडे, रत्नाकर पागिरे,नंदू चौधरी,छायाताई



पागिरे, सुहास खाडे, अँड.इरफान शेख,अस्लम मणियार, ज्ञानेश्वर कोकणे, किरण भोसले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक असिफ शेख सर यांनी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करत प्रास्ताविक केले.

दर्जेदार पद्धतीचे शिक्षण मुलांना देण्याचा आम्ही प्रयत्न करणार असून त्यादृष्टीने सर्व शिक्षक स्टाफ तत्पर असून पालक व शिक्षक यांच्या समन्वयातून व शालेय व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली शाळेने लोक सहभागातून अनेक वर्ग डिजिटल केले असल्याचे सांगितले.

## चेअरमनपदी विजय पगार तर व्हा. चेअरमनपदी अर्चना पगार बिनविरोध

कळवण : (स. गांवकरी)

कळवण बु विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी विजय त्रबंक पगार तर व्हा चेअरमनपदी श्रीमती अर्चना शरद पगार यांची आज संचालक मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते बिनविरोध निवड झाली.

संस्थेचे मावळते चेअरमन काकाजी पगार यांनी आवर्तन पद्धतीने चेअरमनपदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या चेअरमन व व्हा चेअरमनं पदाच्या निवडीसाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होतें. शेतकरी सहकारी संघाचे माजी चेअरमन सुधाकर पगार, कळवण एज्युकेशन सोसायाटीचे सरचिटणीस भूषण पगार,मुरलीधर पगार, भगवान पगार,प्रा. के. के. शिंदे,नंदकुमार खैरनार,निंबा पगार यांच्या प्रमुख




उपस्थितीत सहकार विभागाचे कार्यालयीन अधीक्षक मधुकर गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची विशेष बैठक घेण्यात आली. चेअरमनपदासाठी संस्थेचे संचालक विजय पगार यांचे सूचक म्हणून भास्कर पगार तर अनुमोदक म्हणून किरण पगार तर व्हा चेअरमनपदासाठी श्रीमती अर्चना पगार यांचे सुचक म्हणून संदीप पगार अनुमोदक म्हणून योगेश पगार यांचे स्वाक्षरी असलेले. एकमेव नामनिर्देशन पत्र दाखल झाल्यामुळे त्यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा करण्यात आली. यावेळी पगार समर्थकानी फटाके फोडून व गुलाल उधळन करत जल्लोष साजरा केला.

या वेळी मावळते अध्यक्ष काकाजी पगार,संचालक योगेश पगार, शंकरराव निकम, भास्कर पगार, धिरेन पगार, कारभारी पगार रवींद्र पगार, किरण पगार, संदीप पगार, श्रीमती कल्पना पगार, कारभारी पगार, सुनिल पगार, कैलास पगार, बापु पगार, सचिव निलेश निकम शिपाई दता निकम आदी उपस्थित होते. निवडीनंतर शहरातील विविध संस्था, संघटनांच्या वतीने विजय पगार व अर्चना पगार यांचा सत्कार करण्यात आला. शेतकी संघाचे संचालक राजेंद्र पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी नशिक जिल्हा मजूर संघाचे संचालक रोहित पगार, सतिष पगार, बाबाजी पगार, हरीभाऊ पगार, राजेंद्र पगार, प्रभाकर पगार,देवराम पगार, शातांराम पगार, शामराव पगार, खंडू पगार, सुधाकर पगार,उध्दव महाले, देवा शिंदे,अड,धनंजय आहेर, देवराम पगार,ललित पगार, सुरेश पगार,विनोद मालपुरे, रोहित पगार, शांताराम पगार, संदीप पगार, सूरज पगार, मुन्ना काकुळते,अभी पवार, शरद गागुर्डे,दादा निकम, किशोर महाले, संजय वालखडे, श्याम जाधव, मुंत्युंजय फ्रेडस सर्कल, महाराजा मित्र मंडळ, गणेश नगर मित्र मंडळ उपस्थित होते. धिरेन पगार यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन रवीद्र पगार तर सचिव निलेश निकम यांनी आभार मानले.

> “कळवण बुद्रुक विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची उज्वल परंपरा असून, जिल्ह्यातील सोसायट्यांमध्ये वेगळा नावलौकिक आहे. सर्वांच्या मार्गदर्शनाखाली संस्था, सभासदांचे हित जोपासून संस्थेच्या विकासासाठी कटिबद्ध आहे.”
> **- विजय पगार, चेअरमन कळवण बुद्रुक सोसायटी**